# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:17.03.2025** **वार:सोमवार**

1. शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. जगद्गुरू तुकोबारायांच्या बीज सोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान
3. विदर्भात धवलक्रांती घडवण्यासाठी मदर डेअरी साहाय्यभूत ठरेल, केंद्रीय मंत्री नीतिन गडकरी यांचा विश्वास आणि
4. विधानपरिषदेच्या पाच जागांच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाकडून तीन उमेदवारांची घोषणा

**पंतप्रधान-पॉडकास्ट**

140 कोटी भारतीय आपलं सामर्थ्य असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका पॉडकास्टमध्ये केलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधक आणि पॉडकास्टर लेक्स फ्रीडमन यांच्याशी पंतप्रधानांनी साधलेल्या संवादाचं प्रक्षेपण काल संध्याकाळी फ्रीडमन यांच्या पॉडकास्टद्वारे करण्यात आलं. यामध्ये बोलताना पंतप्रधानांनी बालपण, मुख्यमंत्रीपद आणि पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीपासून जागतिक पटलावरच्या महत्त्वाच्या विविध विषयांवर भाष्य केलं. भारताच्या शांतता संवादाला जगाचा नेहमीच प्रतिसाद मिळतो कारण भारत ही बुद्धांची भूमी आहे, असं सांगून मोदी म्हणाले......

***मैं उस देश का प्रतिनिधित्व कर रहा हूँ, जो महात्मा गांधी की भूमि है। और ये ऐसे महापुरुष हैं कि जिनके उपदेश, जिनकी वाणी, वर्तन, व्यवहार पूरी तरह शांति को समर्पित है और इसलिए सांस्कृतिक रूप से, ऐतिहासिक रूप से, हमारा बैकग्राउंड इतना मजबूत है कि जब भी हम शांति के लिए बात करते हैं, तो विश्व हमें सुनता है। और हम संघर्ष के पक्ष के है ही नहीं, हम समन्वय के पक्ष में हैं। न हम प्रकृति से संघर्ष चाहते हैं, न हम राष्ट्रों के बीच में संघर्ष चाहते हैं, हम समन्वय चाहने वाले लोग हैं। और उसमें अगर कोई भूमिका हम अदा कर सकते हैं, तो हमने निरंतर अदा करने का प्रयत्न किया है।***

भारत तटस्थ राहात नाही; तर आम्ही शांततेसाठी वचनबद्ध असल्याचं पंतप्रधानांनी ठामपणे नमूद केलं. राष्ट्राराष्ट्रांमधल्या संघर्षांबाबत ते म्हणाले की मतभेदांवर नव्हे तर संवादावर लक्ष केंद्रित केलं तरच स्थिर आणि सहकार्यात्मक संबंध निर्माण होऊ शकतात. प्रत्येक संकटाला मी संधी समजतो असंही पंतप्रधानांनी नमूद केलं.

**तुकाराम बीज-शिंदे पुरस्कार**

संत श्री तुकाराम महाराजांचा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा काल देहूमध्ये भाविकांच्या अलोट गर्दीमध्ये अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी राज्यभरातून वारकरी दिंड्या देहूत दाखल झाल्या होत्या. पहाटे काकड आरती, शीळा मंदीर महापूजा, पालखीचं वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान आणि कीर्तनानंतर मुख्य मंदिरात पालखीचं आगमन झालं. यावेळी ज्ञानोबा-तुकाराम अशा गजरात देहू परिसर दुमदमुन गेला होता.

**एकनाथ शिंदे पुरस्कार**

या सोहळ्यानिमित्त, संत तुकाराम महाराज देहू संस्थानच्या वतीनं, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्रीपदाच्या काळात पंढरपूर वारीदरम्यान वारकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या सेवासुविधा तसंच निर्मलवारी हरितवारी या संकल्पनेसाठी शिंदे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तुकाराम महाराजांची प्रतिमा, सन्मानपत्र, पगडी, चिपळ्या, तुकाराम गाथा असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. हा पुरस्कार प्रेरणादायी असून रंजल्या गांजल्याची सेवा करण्याचं बळ यातून मिळतं असं शिंदे यावेळी म्हणाले...

***हा पुरस्कार मिळणं हा माझ्या राजकीय आणि सामाजिक जीवनातला सर्वोच्च आनंदाचा आणि समाधानाचा आणि भाग्याचा क्षण आहे. आपल्या माय मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, मराठीची शान वाढली अभिमान वाढला आज सगळ्यांसाठी ते अभिमानाची बाब आहे. पण चारशे वर्षांपूर्वी तुकाराम महाराजांनी क्लिष्ट असं तत्वज्ञान सोप्या मराठीत सांगितलं, खरं तर हाच अभिजात भाषेचा दर्जा होता, असं माझं मत आहे, आणि खऱ्या अर्थाने कुठलाही भेदभाव न ठेवता फक्त आणि फक्त लोकहितासाठी काम करणं हा उदात्त संदेश संत तुकोबारायांनी आपल्याला दिला.***

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काल तुकाराम महाराजांचं चिंतनस्थळ अशी ओळख असलेल्या भंडारा डोंगर पायथ्याशी आयोजित गाथा पारायण सोहळ्यालाही भेट दिली. डोंगरावर उभारण्यात येत असलेल्या मंदिरासाठी शासन सर्वतोपरी सहाय्य करेल असं आश्वासन त्यांनी दिलं. यावेळी बोलताना ते म्हणाले....

***ज्या आपल्या नद्या आहेत तीर्थक्षेत्रातून जात आहेत या स्वच्छ असल्या पाहिजे, पाणी स्वच्छ असलं पाहिजे, अशी भावना आपली असते. फक्त सरकार म्हणून हे काम होणार नाही, पण नद्यांची सफाई पुनरुज्जीवन ही लोकचळवळ झाली पाहिजे, लोकचळवळ आणि मग लोकचळवळीच्या माध्यमातून बघा तुमच्यासारखी सगळी लोकं पुढे येतील, आणि हा हा म्हणता हजारो लाखो हात या नद्यांच्या स्वच्छतेसाठी पुनर्जीवनासाठी लागतील आणि लोकं बघायला येतील. या महाराष्ट्रातल्या नद्या किती स्वच्छ झाल्या आणि म्हणून त्यासाठी आपलं सामूहिक योगदान आवश्यक आहे आणि ती विनंती मी आपल्याला करायला आलोय.***

**शिवजयंती**

तिथीनुसार शिवजयंती आज राज्यात ठीकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. या निमित्तानं शिवनेरीसह विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांकडून अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**मदर डेअरी-नागपूर**

विदर्भात धवलक्रांती घडवून आणण्यासाठी मदर डेअरी साहाय्यभूत ठरेल असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहातूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी यांनी काल नागपूर इथं केलं. नागपूरच्या सिविल लाईन्स इथं मदर डेअरी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचं भूमीपूजन गडकरी यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. मदर डेअरी आणि महाराष्ट्र शासन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारातून साडेपाचशे कोटी रुपये खर्चाचा हा भव्य प्रकल्प उभारल्याचं गडकरी यांनी सांगितलं. मदर डेअरीनं जिल्हानिहाय पशुधन विकसित करून ते किफायतशीर किमतीमध्ये उपलब्ध करून द्यावं, तसंच, गडचिरोली आणि वाशिम यांसारख्या आकांक्षी जिल्ह्यांकडे विशेष लक्ष द्यावी अशी सूचनाही गडकरींनी यावेळी केली.

**विधान परिषद भाजप**

राज्य विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठीच्या पोटनिवडणूकीसाठी भाजपानं तीन उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरचे संजय केणेकर, नागपुरमधील संदीप जोशी आणि वर्ध्यातले दादाराव केचे यांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना प्रत्येकी एका जागेवर उमेदवार देणार आहे. ही निवडणूक 27 मार्च रोजी होणार असून त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज अखेरचा दिवस आहे. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून गेल्यानं या जागा रिक्त झाल्या आहेत.

**फळबागा विमा**

फळपिकांना विमा संरक्षण देण्यासाठी राज्यातल्या 24 जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या 73 हजार 686 अर्जांपैकी 16 हजार 620 अर्ज अपात्र ठरले आहेत. प्रत्यक्ष फळबाग लागवड नसणे, उत्पादनक्षम बाग नसताना विमा संरक्षण घेणे यासारख्या बाबी पुणे कृषी विभागाने केलेल्या पडताळणीनंतर स्पष्ट झाल्या. अपात्र अर्जांद्वारे 9 हजार 652 हेक्टर क्षेत्रावर बनावट फळपीक विमा काढण्यात आला होता. या अपात्र अर्जांमध्ये सर्वाधिक 7 हजार 334 अर्ज जालना जिल्ह्यातील आहेत.

**मल्हारराव होळकर जयंती-सातारा**

श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांचा इतिहास देदीप्यमान असून सातारा जिल्ह्यात फलटण इथल्या मुरुम गावात त्यांच्या जन्मस्थळाच्या विकासासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिली. सातारा जिल्हा परिषद सातारा आणि मुरुम ग्रामपंचायतीच्या वतीनं श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची 332वी जयंती काल साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते

**दख्खनजत्रा-सांगली**

महिला स्वयंसहाय्यता बचत गटांच्या वस्तुंचं आणि ग्रामीण भागातील शेतकरी उत्पादनांच्या विभागस्तरीय प्रदर्शन आणि विक्री महोत्सवाचं म्हणजे दख्खन जत्रा 2025चं उद्घाटन काल सांगलीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं. या जत्रेच्या माध्यमातून बचत गटांतील महिलांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळाल्यानं महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास प्रोत्साहन मिळेल असं प्रतिपादन पाटील यांनी केलं.

**सायकलिस्ट निधन**

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रताप जाधव यांचं काल पहाटे पुण्यात आकस्मिक निधन झालं, ते 65 वर्षांचे होते. सायकलिंग या खेळासाठी त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित केलं. या क्षेत्रातील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्काराने नुकतंच त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं. राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत दोन वेळा त्यांनी पदक विजेती कामगिरी केली होती.

**मास्टर्सलीग**

इंटरनॅशनल मास्टर्स लीग टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालील इंडिया मास्टर्स संघाने ब्रायन लाराच्या नेतृत्वाखालील वेस्ट इंडिज मास्टर्स संघाचा 6 गडी राखून पराभव केला. रायपूरमध्ये  झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिज मास्टर्स संघाने 7 गडी बाद

148 धावा केल्या. इंडिया मास्टर्स संघाने हे लक्ष्य 17 षटक आणि 1 चेंडूत पूर्ण केलं. अंबाती रायडूने 50 चेंडूत 74 धावा केल्या; रायडूला सामनावीर घोषित करण्यात आलं.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ नोंदवण्यात आली आहे. येत्या दोन दिवसांत विदर्भात उष्णतेच्या लाटेचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# या बरोबरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं

# नमस्कार.